# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०६-०२-२०१९ रोजी (का.प.क्र.२५) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक ०६ फेब्रुवारी २०१९ रोजी (का.प.क्र. २५) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ११.५० वा. वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.निपुण विनायक,नगरसचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| १०. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ११. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १२. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १३. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १४. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १५. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १६. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १७. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १८. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १९. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| २०. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| २१. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| २२. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २३. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २४. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २५. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २६. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २७. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २९. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| ३०. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| ३१. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ३२. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३३. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३४. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३५. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३६. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३७. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३८. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३९. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ४०. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ४१. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ४२. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ४३. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४४. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४५. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४६. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४७. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४८. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४९. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ५०. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५१. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५२. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ५३. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५४. | स.स. श्री.गादगे शितल विरभद्र |
| ५५. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५६. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५७. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ५८. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ५९. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ६०. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ६१. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६२. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६३. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६४. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |

| | |
|---|---|
| ६५. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६६. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ६७. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ६८. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ६९. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ७०. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ७१. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ७२. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७३. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७४. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७५. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७६. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७७. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७८. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ७९. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८०. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८१. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८२. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८३. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८४. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ८५. | स.स. श्रीमती शोभा गुरुलिंगअप्पा बुरांडे |
| ८६. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ८७. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ८८. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ८९. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

२. श्री.कांबळे चेतन जनार्धन

(या वेळी कामगार नेते व संरक्षण मंत्री स्व.जार्ज फर्नांडिस तसेच सिने अभिनेता स्व.रमेश भाटकर यांचे निधन झाल्याने त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.सिताराम सुरे :आपल्या कार्यकाळात अनेकदा आदेश करूनही कामे होत नाही.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी श्री.पदमे,श्री.कोल्हे यांना सुचना दिली होती काम का केले नाही?

श्री.फेरोज खान :आमच्या वार्डात विकास कामे होत नाही. ठेकेदार काम करण्यास तयार नाही.

कार्य.अभि.श्री.कोल्हे :स.श्री.सुरे यांचे वार्डात पाण्याची तक्रार होती. तीन गल्ल्यांमध्ये पाहणी केली पुढच्या वेळेसच्या पाणीपुरवठ्या मध्ये पाणी येईल.

श्री.सिताराम सुरे :पाईप लाईन टाकण्याचे काम चालू का होत नाही? गल्ली नं.२ मध्ये पाईप लाईन फुटली लोकांच्या घरात पाणी येते. तक्रार दिली कार्यवाही होत नाही.

| | |
|---|---|
| | ऐ.सी.लाईन आहे,जुन्या आहे, त्या काढून नवीन टाकावी. दोन वर्ष झाले काम होत नाही. |
| कार्य.अभियंता | :तेथे लाईन टाकणेसाठी डीआय पाईप नाही. विकास कामासाठी उपोषण करावे लागते. तेव्हाच कामे होणार का? भक्तीनगर भागात लाईट बंद आहे. |
| उपअभियंता श्री.खमर | :ही कामे करणेसाठी एमएसईबीला संपर्क करून रु.१५ लक्षचे कोटेशन प्राप्त केले आहे. लेखा विभागाकडे संचिका आहे नंतर दिनांक ५-१२-२०१८ ला ही संचिका सहा.संचालक नगररचना विभागात आहे. पाठपुरावा केला संचिका आली नाही. |
| श्री.विकास जैन | :स्ट्रीट लाईनचे पैसे भरायचे आहे. ताबडतोब पैसे भरण्याचे आदेशीत करावे. |
| | (या वेळी मा.आयुक्त प्रवेश करतात.) |
| मा.महापौर | :१५ लक्ष रूपये ताबडतोब भरावे. त्वरीत धनादेश करावा. |
| श्री.फेरोज खान | :रोषणगेट डीपी शिफ्टसाठी भरावयाचे आहे ते सांगावे. |
| मा.आयुक्त | :सर्व महिला सदस्यांनी सभागृहात मध्यभागी आसन गृह केल्यास सोयीस्कर होईल. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :पाण्याचे कन्टेम्नेशनचे काम होत नाही. ड्रेनेज लाईन वरील ढापे तुटले सहा महिने झाले, कार्यवाही होत नाही. जीएसटीचे २१-२२ कोटी रुपये येतात ते कोणत्या कामासाठी येतात? माहिती द्यावी. |
| श्री.भाऊसाहेब जगताप | :विषय क्र.७७४ क्रमांकाचा विषय मंजूर केला. त्यात असे होते की, खेळाचे मैदान हे राजकीय पक्षाचे सभेसाठी व लग्नासाठी देऊ नये. परंतु रस्त्यावर पोलिस विभाग परवानगी देत नाही म्हणून अशा जागेवर सभेसाठी व लग्नासाठी परवानगी असावी दुरूस्तीसह मंजूर करावे. |
| मा.महापौर | :दुरूस्तीसह मंजूर. आवश्यतेनुसार मागणी नुसार राजकीय प्रतिनिधीचे अर्ज येतील. नियमानुसार शुल्क आकारून कार्यवाही करावी. पाणीपुरवठा मेन्टेनंन्सचे काम ठेकेदार करीत नाही. पाणी अनियमित येणे, वेळेवर येत नाही. सर्वांच्या समस्या सारख्या आहे. ठेकेदाराना पैसे दिले. नुर कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी कामे घेतली कामे करीत नाही. हे योग्य नाही कार्यवाही करावी. |
| कार्य.अभियंता | :मेन्टेनंन्सच्या कामाचे पेमेंट दिले ती कामे आता सुरू ही केली आहे. |
| श्रीमती संगिता वाघुले | :वार्डातील विहिरीची समस्या सोडत नाही. तीन वर्ष झाले त्या भागात पाणी येत नाही. टेंडर काढले जात नाही. लोकांना विकत पाणी घ्यावे लागते. |
| कार्य.अभियंता | :टेंडर दोन आले होते परंतु त्यात एमजीपीचे रजिस्ट्रेशन नाही. |
| मा.महापौर | :स.श्रीमती वाघुले यांचे वार्डातील विहिरीची संचिका मागवून घ्यावी. मा.आयुक्तांची सही घ्यावी, योग्य कार्यवाही करावी. |
| श्रीमती मिना गायके | :मेन्टेनंन्सचे काम होत नाही. पाईपलाईन बदलावी लागेल काम होत नाही. |
| कार्य.अभियंता | :काम सुरू केले आहे. ड्रेनेज लाईन ही पाणीपुरवठा लाईनवर टाकली आहे. |
| कार्य.अभियंता-ड्रेनेज | :पाहणी केली, ड्रेनेज खाली पाणी लाईन आहे जुनी आहे. ती शिफ्टींग करावी लागेल. |
| मा.महापौर | :श्री.कोल्हे व श्री.अफसर सिद्दीकी यांनी ताबडतोब प्रश्न सोडावा. |
| श्री.आत्माराम पवार | :घाण पाणी येते ड्रेनेज,पाणी,लाईट कोणतीच कामे होत नाही नुसती चर्चा होते. |

| | |
|---|---|
| उपअभियंता श्री.फालक | :स.श्रीमती गायके ताई यांचे वार्डातील ५ कामे आहे. त्यातील एका कामाची वर्क ऑर्डर झाली पाईपची ऑर्डर दिली आहे. |
| श्रीमती सुरेखा सानप | :माझे वार्डात दुषीत पाणी येते. |
| श्रीमती मनिषा मुंढे | :वार्डातील नाल्याचे काम होत नाही. एकाचा मृत्यू झाला, पुन्हा तसे होऊ शकते काम त्वरीत करावे. |
| कार्य.अभियंता-ड्रेनेज | :जयभवानी नगर येथील नाल्याचे काही काम केले आहे त्या ठेकेदारास पेमेंट न दिल्याने काम करण्यास हलगर्जी करीत आहे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :ठेकेदार काम करीत नसेल तर कशासाठी काम घेता नियमात काय आहे? काम घेणार, थांबविणार हे योग्य नाही. |
| श्री.प्रमोद राठोड | :मा.आयुक्तांनी सांगितल्यानंतर बील काढत नाही व असे असतांना सुध्दा ठेकेदार काम करीत नाही. |
| श्री.नाईकवाडी अब्दुल | :टेंडर काढले नंतर काम केले पाहिजे.काम करीत नसेल तर ब्लॅक लिस्ट करावे. |

(या वेळी अनेक सदस्य डायस समोर जमा होतात.)

| | |
|---|---|
| श्री.राजू शिंदे | :जयभवानी नगर येथील नाल्याचे काम झाले नाही. एक व्यक्तीचा मृत्यू झाला. एक अधिकारी त्याच प्रकरणावरून निलंबीत झाले होते ती वेळ येण्याची वाट पाहतो का? |
| मा.महापौर | :रु.२०० कोटीचे बीले थकीत आहे प्राधान्य ठरवून घ्यावे. जयभवानी नगर येथील नाल्याचे राहिलेले कामासाठी शुक्रवार पर्यंत निर्णय घ्यावा. |
| कार्य.अभियंता-ड्रेनेज | :सोमवारी काम चालू करण्यात येईल. |
| श्रीमती सुरेखा सानप | :माझे वार्डात नाल्यात पडून शेळीचा मृत्यू झाला. तेथील गाळ काढला जात नाही. |
| मा.महापौर | :श्रीमती सानप यांचे वार्डात जाऊन शहर अभियंता यांनी पाहणी करावी. |
| श्री.अय्युब जहागीरदार | :पाणी या विषयावर चर्चा झाली होती. टाकीतून देणारे पाणी सिस्टम जुनी आहे त्यात सुधारणा करावी लागेल असे म्हटले होते. तीन महिने झाले प्रशासनाने काय कार्यवाही केली? नवीन सिस्टमने पाणी देणार होते. वॉल बंद करणे व देखरेखसाठी कर्मचारी नाही असे सांगण्यात आले तर अधिकारी काय काम करतात? घाटी दवाखान्यात पाणीपुरवठा होत नाही. विकत पाणी घेतात. कर्मचारी नाही सांगता परंतु रात्री ३ वाजता पाण्याच्या टाकीवरून पाणी चोरी करून माणिक हॉस्पीटलला पुरवठा केला जातो. त्याचे रेकॉर्ड माझेकडे आहे. जेथे आवश्यकता आहे तेथे पाणी दिले जात नाही हे बरोबर नाही. आरोग्य विभागाच्या मार्फत स्त्रीभ्रुण हत्या प्रकरण उघडकीस आणले अभिनंदन केले. परंतु यापूर्वी आरोग्य विभागाला माहिती का मिळाली नाही? प्रत्येक तीन महिन्याला प्रत्येक नर्सिंग होममध्ये सोनोग्राफी सेंटरची तपासणी करणे आवश्यक असते. ज्यांना जबाबदारी दिली होती त्यांनी ती पार का पाडली नाही? जे महिला डॉक्टर या प्रकरणात पकडले गेले त्याची बहीन मनपाच्या दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी आहेत. या सर्व प्रकरणाची चौकशी करून ज्यांनी चुक केली त्यांचेवर कार्यवाही करावी. |

श्रीमती मनीषा लोखंडे :वार्ड क्र.१६ मधील ड्रेनेज लाईनच्या विकास कामाची संचिका गहाळ झाली होती. श्री.विटेकर यांनी कोणतेही कार्यवाही केली नाही. दोन्ही कॉलनी मागासवर्गीय असल्यामूळे काम होत नाही, असे नागरीक म्हणतात. दुर्लक्ष केले. कार्यालयात हजर न राहणे, संचिकेवर शेरा देणे, असे करणे योग्य नाही. श्री.विटेकर यांची त्वरीत बदली करावी.

मा.महापौर :श्री.विटेकर काम करीत नसेल तर कार्यवाही करावी.

श्रीमती ज्योती अभंग :सफाई कामगाराची वस्ती आहे तेथे कामे होत नाही पाणी देत नाही. तेथे इंधनविहिर करणार होते पाणी लागत नाही सांगतात. बाजूलाच पाणी लाईन आहे तेथे जोडणी करून पाणी देऊ शकतो जास्त खर्च लागणार नाही.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :अंदाजपत्रक केले टेंडरला आहे. इंधनविहिर बाबत टेस्टींग झाली आहे पेमेंट केले. रिपोर्ट यायचा आहे. ३-४ स्पॉट दाखविले होते पाठपुरावा करतो आहे.

मा.महापौर :रिपोर्ट मागवावा. ताबडतोब कार्यवाही करावी.

श्रीमती सुरेखा सानप :फुले नगर कामाचे अंदाजपत्रक केले, काम केले नाही. उत्तरानगरीचे कामाचे टेंडर काढले, काम केले नाही. एका ठिकाणी काम करणार होते तर नो-नेटवर्क एरिया येतो म्हणून थांबविले आहे. ३-४ गल्ल्यात पाणी येत नाही. संचिका केली सांगता कार्यवाही होत नाही. २० वर्षापासून वस्ती आहे. नवीन इमारती ज्या बिल्डरने बांधल्या तेथे पाणी दिले जाते हे योग्य नाही.

कार्य.अभियंता :एक काम निविदा मंजूरीसाठी व एक कामाची निविदा काढणेसाठी संचिका आहे. नो-नेटवर्क एरिया म्हणजे जेथे पाणी दिले नाही व नवीन पाईप लाईन टाकू शकत नाही. टँकरची मागणी केली तर पाणी देऊ शकतो. पे टँकर सिस्टम देऊ शकतो.

मा.महापौर :मेन्टेनंसचे काम असेल तर ते करावे. तसेच श्रीमती सानप यांचे वार्डात टँकरने पाणी देता येत असेल तर तशी कार्यवाही करावी. निविदेची कार्यवाही करावी.

श्रीमती माधुरी देशमुख :माझे वार्डात गुरूसहाणीनगर भागात, एन-३ मध्ये १५ घरांना, एच-सेक्टरमध्ये व इतर भागात पाणी येत नाही. जे कर भरतात तेथे पाणी मिळत नाही. असे ठिकाणी पाणी देण्याची कार्यवाही करावी. सदस्यांना सांगण्याची वेळ का येते?

कार्य.अभियंता-पापू :गुरूसहाणीनगर भागात फारसा काही प्रॉब्लेम नाही.

श्री.प्रमोद राठोड :तेथे पाणी येत नाही. चुकीची माहिती अधिकारी देत आहे. पाईप टाकले काम का पुर्ण केले नाही? कितीची पाईप टाकायची ते प्रशासनाने ठरवावे पाणी द्यावे.

श्रीमती माधुरी देशमूख :पाण्याची वेळ नाही. आम्हाला फोन करावे लागतात. आठ दिवसात काम करणार होते. अधिकारी यांना समस्या माहित आहे काम करीत नाही. पाण्याच्या टाकीमध्ये कुणी विष टाकण्याची शक्यता आहे. अशा बातम्या होत्या उपाययोजना काय केली? एन-५ च्या टाकीवर स्लॅब नाही हिरवी मॅट टाकली आहे. ईसीएसच्या काही लोकांनी पाण्याची रेकी केली होती. घातपात होण्याची शक्यता आहे. उपाय काय केले?

श्री.राजेंद्र जंजाळ :इसीएसच्या काही लोकांनी पाण्याच्या टाकीची रेकी केली. पाण्याच्या टाकीत विषद्रव्य टाकून नरसंहार घडविण्याची त्यांची योजना होती, असे पोलीस विभागाकडून रिपोर्ट दिला आहे. शहरात टिळकपथवर बुट विकणारे मोसी आणि सरफराज यांनी रेकी केली. त्यांचे लॅपटॉपमध्ये टाकीचे फोटो सापडले.

त्यांनी म्हाडाच्या घरात एक प्रयोग शाळा सुध्दा सुरू केली होती. विषारी द्रव्य असलेले बॅनर तेथे सापडले म्हणजे जे लोक पाणी पितात त्यांना मारण्याचा प्रयत्न होता. एक व्यक्ती पाण्याच्या टाकीला केबल बांधत होता ज्या टाक्या आहे वाऱ्यावर सोडल्या सुरक्षा नाही. २३ जानेवारीला कार्यवाही झाली परंतु आजपर्यंत संरक्षण करण्याची जबाबदारी घेतली नाही. दुसरी माहिती अशी मिळते की, त्यांना मंदीरामध्ये जो भंडारा आहे त्यातून विषप्रयोग करायचा होता.

कार्य.अभियंता-श्री कोल्हे:सुरक्षा रक्षकासाठी मागणी केली आहे. पत्रव्यवहार केला आहे.

मा.महापौर :याची दखल घ्यावी, टाक्याची सुरक्षा करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :पोलीस विभागाने मनपास पत्र दिले की, टाकीच्या सुरक्षतेच्या बाबतीत काळजी घ्यावी तरीही कार्यवाही होत नाही. हा विषय यापूर्वी चर्चेला आला होता. टाकीवर सीसीटीव्ही कॅमेरे लावावे. स्वच्छता केव्हा झाली ते पहावे टाकीवर झेंडे लावले जाते. केबल लावले जाते ते काढावे. संरक्षण भिंतीच्या आत तेथे प्रवेश नको.

मा.महापौर :सुरक्षा विभागाचे उपआयुक्त यांनी ताबडतोब सुरक्षा देण्याची कार्यवाही करावी.

कार्य.अभियंता-पापू :एन-५ टाकीवर असलेली मॅट फाटली असेल तर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.राजेंद्र जंजाळ :पाण्याचे टाकीतील पाण्याची टेस्टींग करतो का? करत असेल तर मला रिपोर्ट द्यावा. टाकीवर काही लोक दारूच्या बाटल्या घेऊन बसतात. सम जवळ बसून दारू पितात.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर: टाकीवर सीसीटीव्ही कॅमेरे लावावे.

मा.महापौर :मा.आयुक्तांनी स्वतः या बाबतीत प्लॅन केला आहे योग्य ती कार्यवाही करावी.

श्रीमती शोभा बुरांडे :शहानुरवाडीमध्ये दुषीत पाणी येते. तसेच प्रतापनगर भागात पाणी येत नाही. पाईप छोटे आहे कमी पाणी येते.

श्री.रावसाहेब आमले :वार्ड क्र.१४ पडेगाव मध्ये पाण्याची काय व्यवस्था आहे?

कार्य.अभियंता :काही भागात टँकरने पाणी देतो. काही भागात नंदनवन कॉलनीकडून लाईन येते.तेथुन करतो. विहिरीवरून पाणी आणतो. मिरानगर भागात टँकरने पाणी देतो.

श्री.रावसाहेब आमले :पडेगाव भागात विहिर नाही. एक टँकर साठी ५० पत्र द्यावे लागते. टाकीवर दलाल ठेवले. पत्र देऊनही पाणी देत नाही. जेथे पाणी आहे तेथेच पाणी दिले जाते व ५-१० लाख टँकरची रक्कम देतो बील भरतो. एकाही नळाला पाणी येत नाही.

वार्ड अभियंता :पडेगाव कडे जी नंदनवन कॉलनीतून लाईन जाते त्यावरील ३ वेळा इललिगल कनेक्शन तोडले होते.

श्री.रावसाहेब आमले :नळ तोडले व मनपाचे अधिकारी,कर्मचारी पुन्हा ५-५ हजार रुपये घेऊन कनेक्शन देत आहे. टँकरने सुध्दा पाणी देत नाही. नळ कनेक्शन घेणेसाठी लोक पैसे भरण्यास तयार आहे. पाच वर्षात एकदाही नळाला पाणी आले नाही.

श्री.जमीर कादरी :नळ घेणेसाठी लोक पैसे भरण्यास तयार आहे. संचिका गायब करतात. कनेक्शन देत नाही.

मा.महापौर :पडेगाव, मिटमिटा भागात पाण्याची व्यवस्था करावी.

| | |
|---|---|
| कार्य.अभियंता | :बैठक घेतली जाईल प्रश्न सॉल्व्ह करतो. |
| श्रीमती आशा निकाळजे | :माझे वार्डातील विकास कामाची वर्क ऑर्डर थांबविली. |
| श्री.कैलास गायकवाड | :भिमा-कोरेगाव स्तंभ संदर्भात संचिका का थांबली? वर्क ऑर्डर का होत नाही? |
| मा.महापौर | :या प्रकरणात मा.पोलीस आयुक्तांची परवानगी लागेल असे प्रशासनाचे मत आहे. |
| श्री.कैलास गायकवाड | :पोलीस विभागाची परवानगीची गरज नाही असे मत आहे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :उद्‌घाटन केले त्यापुर्वी सर्व प्रोसेस का केली नव्हती? |
| मा.महापौर | :या संदर्भात ज्या-ज्या अडचणी असतील संबंधीत अधिकारी यांना पाठवून योग्य ती कार्यवाही ०२ दिवसात करावी. |
| श्रीमती आशा निकाळजे | :वर्क ऑर्डर आज द्यावी काम सुरू करावे. |
| मा.महापौर | :इतर कामे चालू करावे. वर्क ऑर्डर द्यावी. जे परवानगी वगैरे लागते ती घ्यावी. आठ तारखेला स्थायी समिती सभा आहे त्या सभेत तो विषय आहे. मंजूर झाल्यानंतर कार्यादेश देण्यात येईल. |
| श्रीमती सिमा चक्रनारायण | :नाल्यावरील अतिक्रमण, रस्त्यातील टपऱ्या हातगाड्या अतिक्रमण काढावे. |
| श्री.बन्सी जाधव | :म्हसोबानगर, साफल्यनगर भागातील पाण्याच्या लाईनचे काम होत नाही. तसेच ड्रेनेज लाईनचे ८०० मीटर लाईन टाकायचे काम केले. आणखी २०० मी. राहिले ते होत नाही. |
| कार्य.अभियंता | :वर्क ऑर्डरसाठी आहे. २ टक्के रक्कम भरण्यास ठेकेदारास पत्र दिले. |
| श्रीमती ज्योती मोरे | :टँकरला पावती सिस्टम करावी. अनेकदा पाणी देण्यास खंड करतात. |
| मा.महापौर | :ती संचिका मागवून घ्यावी. ठेकेदारास बोलवून घ्यावे, काम सुरू करावे. |
| श्रीमती मुल्ला सलिमा बेगम | :वॉर्ड क्र.१०८ वॉर्डात दुषीत पाणी येते. लोक आजारी पडत आहे. वर्क ऑर्डर होऊन ठेकेदार काम करण्यास तयार नाही. अर्धा वार्डात पाणी येत नाही. ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाण्यात जाते. |
| कार्य.अभियंता-पापू | :पाईपलाईन टाकण्याचे टेंडर केले. ७-८ वेळेस रिकॉल केले. टेंडर घेण्यात कुणी तयार नाही. |
| मा.महापौर | :ठेकेदारास काम करण्यास सांगावे. कन्व्हेंस करावे, तेथील काम करून घ्यावे. |
| श्री.शेख जफर | :गल्ली नं.२,१५,१९,२०,२१ मध्ये दुषीत पाणी येते. वारंवार पत्र दिले, कार्यवाही होत नाही. श्री.पदमे यांना पत्र दिले. दारू पिऊन लाईनमन पाणी सोडतात. फोन केला तर उचलत नाही लाखो लिटर पाणी वाया जात होते. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :साईनगर भागात पाण्याचा प्रश्न आहे. कन्टेम्नेशचे काम होत नाही. फोन उचलत नाही. पत्र दिले आंदोलन करण्याचा इशारा दिला तरी कार्यवाही नाही. १२ पाईप टाकले पुढचे काम सोडून दिले. शिवनेरी कॉलनी मध्ये काम होत नाही. अविष्कार कॉलनीत पाणी येत नाही. कमी दाबाने पाणी येते. तीन वर्षापासून हे होत आहे. |
| कार्य.अभियंता | :दुषीत पाण्याचा प्रश्न सोडला होता. तेथे नवीन लाईन टाकायची आहे. ठेकेदार प्रतिसाद देत नाही. उद्या तेथे पाहणी करतो. श्री.जफर शेख यांचे वार्डातील समस्याची पाहणी केली जाईल. |
| मा.महापौर | :दोन्ही वार्डात जाऊन पाहणी करावी. प्रश्न सोडवावा. माझेकडे रिपोर्ट करावे. |

मा.आयुक्त :पाण्याचा प्रश्नाबाबत चर्चा केली, नोंद घेतली. महिला सदस्य सक्षम आहे तेही प्रश्न मांडतात. फोन केल्यास अधिकारी यांनी घ्यावा. अधिकारी यांनी विकास कामाविषयी पाठपुरावा केला पाहिजे. काही संचिका ४८ वार्डात कामे मंजूर केली ती कामे करावी. शहरात रु.१५ लक्ष लोकसंख्या आहे २०३ एमएलडी पाण्याची मागणी आहे. १२५ एमएलडी पाणी उपलब्ध होते. १० लक्ष लोकसंख्या नेटवर्क एरिया मध्ये आहे. इतर ३ लक्ष व सातारा देवळाई २ लक्ष अशी लोकसंख्या आहे. जेवढ्या पाईपलाईन पाहिजे तेवढ्या टाकू शकलो नाही. त्यासाठी समांतर योजना आणली होती. प्रस्ताव दिला होता मान्य केला. त्या बाबत कायदेशीर सल्ला घेतला लिड मेम्बर आहे बदलून पाहिजे होता. गर्व्हन्मेंट पिडर व मा.उच्च न्यायालय यांनी जो सल्ला दिला त्यानुसार करणे शक्य नाही. त्यानुसार कंपनीला कळविले आहे. ते होत नसेल तर पुनरूज्जीवण करणे कंपनीला शक्य होत नाही असे त्यांनी कळविले. ही परिस्थिती सभागृहासमोर मांडली. पुनरूज्जीवन करणेसाठी कायदेशीर अडचणी असल्यामुळे होणे शक्य नाही. त्यामूळे इन्स्ट्रक्चरच्या वाढीसाठी जो पर्यायी प्रस्ताव आहे तो शासनाकडे पाठवून ती योजना हाती घेतली पाहिजे. या सभागृहात श्री.होलानी साहेबांनी सादरीकरण केले होते. जुने पंप बदलून ते काम केले. तसेच असमानता आहे. कमी जास्त पाणी येते. सम प्रमाणात मिळावे त्या नुसार ६ प्रस्ताव ठेवले. रु.१० कोटी लागतात. प्रस्ताव मंजूर केले, टेंडरवर ते आहे उपलब्ध पाण्यामधून १० एमएलडी पाणी वाढेल. स्मार्ट सिटी मधून प्रस्ताव करतो आहे मुळ आराखडा करतो आहे. केंद्र शासनाला कल्पना दिली. ग्रीन सिग्नल दिला. डीपीआर बनवून कामे हाती घेणार आहे. ३० एमएलडी पाणी वाढणार आहे. समांतर योजना नसेल तर पर्यायी योजना १५ कि.मी अंतर्गत जलवाहिनी ४३ नवीन टाक्या करायच्या आहे. ३१ जानेवारी पर्यंत रु.१८२ कोटी देणे मनपाकडे आहे. यामूळे पुढील कामे हाती घेण्यास गती येत नाही. ठेकेदार यामूळे पूढे येत नाही. ठेकेदाराचे म्हणणे आहे की, पैसे नसेल तर टेंडर काढू नये. मागील वर्षाच्या तुलनेत मालमत्ता कराची वसुली रु.२८ कोटीने जास्त आहे. मालमत्ता विभागासाठी कायमचा अधिकारी नसल्यामूळे वसुली कमी झाली. काही किरकोळ कामे आहे ती स्पीडमध्ये होईल रूटींगची कामे चालू ठेवली जाईल. पाणी पुरवठा व ड्रेनेज बाबत मुद्दे मांडले त्यानुसार कार्यवाही केली जाईल. शहर अभियंता यांनी लक्ष द्यावे.टाक्याचे संरक्षण बाबत सुरक्षा मागविले होते. सेक्युरिटी लागतात. त्याचा आढावा घेतला जाईल. आणखी कर्मचारी घेतले जाईल.

श्री.त्र्यंबक तुपे :समांतरचा प्रस्ताव रद्द करणेसाठी आला होता आताचे मा.आयुक्तांनी प्रस्ताव ठेवला तो पुनरूज्जीवनसाठी ठेवला. तो देत असतांना त्यांचेशी चर्चा केली की नाही. त्यांनी होकार दिल्यानंतर मंजूरी दिली असे आमचे मत आहे. पुन्हा ठराव येत आहे ऐनवेळी असला तरी चर्चा करावी. मा.आयुक्तांची भुमिका असते त्यास आमचा पाठींबा असतो. श्री.बकोरिया साहेबांनी प्रस्ताव ठेवला होता. तेव्हा जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंत लाईनचे काम हाती घ्यावे असे म्हटले होते. मी महापौर होतो त्यावेळी जे पैसे होते त्यातून टेंडर काढले असते ती लाईन पुर्ण

झाली असती. आज खर्च वाढत आहे तो कमी झाला असता. नवीन प्रस्ताव आला शासनाकडे जाणार आहे. आम्हाला आता कळाले हा प्रस्ताव आला. शासन पैसे देत असेल तर हरकत नाही. एक प्रस्ताव रद्दचा येतो दुसरा पुनरूज्जीवनचा येतो. जनता विचारेल सभागृह असे कसे निर्णय घेतात? आता प्रस्ताव आणला निर्णय घ्यावा. पुन्हा येण्याची वेळ येणार नाही. शहरातील जुन्या लाईन मोठ्या प्रमाणात टाकायच्या जुन्या शहरात अनेक दिवसापुर्वीच्या लाईन आहे. त्या बदलणे आवश्यक आहे. समान पाणी देणेसाठी पॅरलल लाईन टाकणे आवश्यक आहे. प्लॅनींग करत असतांना पुर्ण करावे. डीपीआर समोर पाहिजे. जेथे मुख्य लाईन आहे तेथे ४-५ तास पाणी असते. जे हॉटेल कमर्शियल असतील त्यांनाही तेवढाच वेळ पाणी मिळाले पाहिजे. उत्पन्न वाढले पाहिजे तर विकास होईल. रु.२८ कोटीनी वाढले त्यापेक्षाही वाढेल, प्रयत्न करावे. प्रशासन म्हणून मा.आयुक्तांनी काम करावे. जेष्ठता यादीनुसार बिल दिले जावे. रु.१८२ कोटीचे देणे आहे. दोन चार वर्षात रु.५०० कोटी होतील. शासनाने रस्त्यासाठी निधी दिला. त्यातून रस्त्याची कामे मार्गी लावावी. समांतरबाबत पुन्हा प्रस्ताव ठेवण्याची वेळ येऊ नये. असा निर्णय होणे अपेक्षीत आहे.

श्री.सिताराम सुरे :ज्या रस्ते चांगले असतील ते सिमेंटचे करू नये. ड्रेनेज, पाणीपुरवठ्यावर खर्च करावे. रु.१०० कोटी मध्ये १२ रस्ते असे की १० वर्ष खराब झाले नसते.

मा.महापौर :पाणीपुरवठ्याची समस्या आहे. नोडल ऑफिसर म्हणून श्री.पानझडे यांनी नियुक्ती केली आहे. श्री.होलानी यांनी जे प्रस्ताव दिले त्याचा विचार होणार आहे. स्मार्ट सिटीच्या पैशातून पाणीपुरवठ्याची कामे होणार आहे. निविदा, अंदाजपत्रक असेल कन्टेम्नेशनचे विषय असतील तात्काळ कामे करावी. पाण्याच्या टाकीच्या सुरक्षेतेबाबत योग्य ती कार्यवाही करावी. सभा आता तहकूब करण्यात येते. (वेळ २-४५ वाजता.पुन्हा सभा ३-४५ वाजता सुरू)

श्री.त्र्यंबक तुपे :समांतरचा विषय पुढील सभेत घ्यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :रु.८० कोटी करातून जमा झाले. एलबीटीचे पैसे येतात. शासन अनुदान येते असे असतांना खर्च कुठे होत आहे? उत्पन्नाच्या वाढीच्या संदर्भात बैठक घ्यावी. प्रशासनाने नियोजन काय केले? पाणीपट्टी, होर्ल्डींगची वसुली किती? टी.पी. विभागाची वसुली किती? टॉवर्स किती अधिकृत केले? नुसती चर्चा होते शाळेचे अनुदान येत नाही. रु.१-२ लक्षची संचिका मंजूर होत नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :४८६ मोबाईल टॉवर्स आहे. ६० टॉवर्सला मंजूरी आहे. ४२६ टॉवर्सला मंजूरी नाही. मंजूरी दिलेले टॉवर्सकडे रु.१.१७ कोटी आहे. ४२६ टॉवर्सकडे रु.१४.७६ कोटी थकबाकी आहे. कोटीने पैसे जमा करीत नाही व जनतेला साफसफाई कर युजर चार्जेस म्हणून प्रस्ताव आणतो हे योग्य नाही. वसुली किती करतो? करन्ट किती करतो? माहिती देत नाही. जे कर भरतात त्यांचेकडून वसुली करतो असे दिसते. जे भरणा करीत नाही त्यांचा डाटा सुध्दा नाही. जे जे कमर्शियल म्हणून वापर आहे त्यांचेकडून तातडीने वसुली करावी. इललिगल टॉवर्स बाबत काय कार्यवाही करणार आहे?

श्री.राजगौरव वानखेडे :वर्ग -४ च्या कर्मचाऱ्यांना वसुलीचे काम देतो हे योग्य नाही.

श्री.राजू शिंदे :मा.आयुक्तांना सभागृहात येऊ द्यावे. त्यानंतर वसुलीवर चर्चा करावी. प्रशासनाने वसुलीसाठी काय प्रयत्न केले? अधिकार मा.आयुक्तांनी वाटप करून दिले. त्यामूळे असा प्रश्न निर्माण झाला. मुलभूत सुविधांवर लक्ष देणे आवश्यक आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :आज जो कचरा संदर्भात विषय आहे. त्यात शहरात २.३० लक्ष घरे आहे. असे प्रशासनाच्या ठरावात आहे. टॅक्स वसुली करायची तेव्हा एवढे घरे आहे ते माहित नाही का?

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:रस्त्याचे अर्धवट कामे करीत आहे. वसुलीही वाढवावी सिनेरिटी नुसार बील द्यावे. १ सप्टेंबर पासून होल्डींगसाठी अभय योजना राबविली होती. वाजवी पेक्षा मोठ्या आकाराचे होल्डींग लावलेले आहे. मला माहीती दिली नाही. किती अधिकृत केल?

मा.महापौर :मालमत्ता करामध्ये सूट देण्याची कार्यवाही केली. त्याच बरोबर होल्डींग बाबत अभय योजना राबविली होती. तेव्हा कुणी आले नाही. पुन्हा सर्वे करून कार्यवाही करावी. आठ दिवसात सर्वे करून कार्यवाही करावी नसता रद्द करावे.

श्री.गंगाधर ढगे :माझे वार्डात विविध ठिकाणी पोल व एलईडी फिटींग लावणे बाबत रु.५ लक्षची संचिका होती. त्यात पोल ठेकेदाराकडून व लाईट एलईडीकडून बसवावे असे दिले. लाईट फिटींग देणार नाही असे सांगतात. कंपनी करीत नाही श्री.देशमुखही काम करण्यास तयार नाही.

श्रीमती मुल्ला सलीमा बेगम:स्मशान भुमीमध्ये लाईट बंद आहे. अनेकदा पत्र दिले कार्यवाही होत नाही.

उपअभियंता श्री.देशमुख:तीन दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

श्री.राजू शिंदे :जेथे लाईट चालू आहे तेथे एलईडी लावत असेल तर योग्य नाही. जेथे बंद आहे तेथे एलईडी लावावे. जेथे पोल आहे परंतु लाईट नाही तेथे लाईट लावावे.

मा.महापौर :योग्य ती कार्यवाही करावी. जेथे लाईट बंद आहे तेथे एलईडी लावावे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:३० व्हॉटस्चे लाईट लावले बंद पडतात प्रकाशही नाही.

श्री.गंगाधर ढगे :एलईडीचे ४८ लाईट लावले १४ बंद पडले आहे. जुन्हा बाजार ते मनपाकडे येणाऱ्या रस्त्यावर ३० व्हॉटस्चे लाईट लावले आहे. प्रकाश नाही. दरमहा एजन्सीला पैसे देतो यावर कुणाचे नियंत्रण नाही. कसे ही काम करणार का? काही वार्डात ४०० फिटींग तर काही वार्डात शुन्य फिटींग असा भेदभाव असू नये.

मा.महापौर :प्रकाश जेवढा असायला पाहिजे तो आहे का? निकष पाळले जातात का ?

उपअभियंता :तातडीने काही ठिकाणी लाईट लावले जातात.

श्री.फेरोज खान :चायना लाईट लावले जात आहे. मेंटेनंसचे काम बंद आहे. लाईट बंद असल्यामूळे चोरी होत आहे. ५० फुटाच्या रस्त्यावर ३० व्हॉटस्चे लाईट लावले जाते योग्य नाही. रेग्युलर पेमेंट काम न करता देत आहे. इंजिनिअरींगचा रिर्पोट पैसे देऊन आणला जातो.

श्री.राजगौरव वानखेडे :शहरात किती एलईडी फिटींग लावले आहे? कुठे लावले? ९,१२,१५ मीटरवर कोणते व्हॉटस्चे लाईट असावे हे ठरले आहे त्यानुसार होते का? एलईडीमूळे किती बीलात बचत झाले आहे? मोठ्या रस्त्यावर जास्त व्हॉटस्चे लाईट असावे.

(या वेळी सभागृहात मा.आयुक्त आगमन करतात.)

मा.महापौर :जेथे लाईट फिटींग मनपाच्या आहेत तेथे लाईट लावले जात आहे. एलईडी लाईट लावत आहे तर बील किती कमी येते. थर्ड पार्टी याचा अहवाल घेतो का? श्री.ढगे यांचे वार्डात पोल उभे केले. लाईट लावत नाही तेथे लाईट कधी लावणार आहे? जेथे पोल आहे तेथे लाईट लावावे. जुने लाईटचे काय करतो? या सर्व बाबतीत अहवाल सादर करावा.

श्री.राजू शिंदे :सातारा देवळाई येथे १००० फिटींग लावणार होतो त्यांचे काय झाले? चार तार ओढले एक तार बाकी आहे.

मा.महापौर :स.सदस्य श्री.सिताराम सुरे यांचे वार्डातील कामे करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :नवीन लाईट लावल्यानंतर जुनी लाईट कुठे ठेवतो ते उपयोगात आणता येतील का? नसता लिलाव करून विक्री करावे.

श्री.राजू शिंदे :जेथे लाईट नाही तेथे एलईडी लावावे. जे लाईट चालू होऊ शकतात तेथे एलईडी लावण्याची गरज नाही. तेथे एक टीम कायम ठेवावी.

उपअभियंता :सातारा-देवळाई येथील २०० पोलवरचे काम बाकी आहे. ८०० पोल लावले आहे.

मा.महापौर :सातारा देवळाई भागात लाईट फिटींगसाठी वाहने व लाईनमन देण्यात यावे. रेग्यूलर कर्मचारी ठेवावे.

श्रीमती संगिता वाघुले :१०-१० फिटींग लावतात. पुर्ण काम केले जात नाही.

श्री राजगौरव वानखेडे :झोनवॉईज वसुली किती झाली. टी.पी. विभाग व होल्डींग बाबत किती वसुली केली?

श्रीमती रेशमा कुरैशी :७९ एलईडी लाईट वॉर्डात बंद आहे.

मा.महापौर :तातडीने लाईट बसवावे.

श्रीमती अर्जना निळकंठ :बालवाडी शिक्षकाच्या मानधनाबाबत कार्यवाही का होत नाही? प्रशासकीय मान्यता झाली. अंमलबजावणी का होत नाही?

श्रीमती मुल्ला सलीमा बेगम:मनपाची उर्दु शाळा आहे. पाच शिक्षक, ४०० विद्यार्थी आहे. शिक्षक देत नाही.

शिक्षणाधिकारी :मुख्याध्यापक सह ८ शिक्षक आहे. विद्यार्थी २२० आहे. ९ वीचा वर्ग असल्यामूळे एक शिक्षक जास्त दिले. नियमानुसार ६ शिक्षक देता येतात. बालवाडी शिक्षक दिले आहे.

मा.महापौर :प्रॅक्टीकली बघावे त्यानुसार शिक्षक द्यावे. सदस्यांची सुचना विचारात घ्यावी.

श्रीमती सुरेखा सानप :नारेगाव उर्दु शाळेत १ शिक्षक आहे

मा.महापौर :तात्पुरती व्यवस्था करावी शिक्षक द्यावे.

(या वेळी डायस समोर सदस्य बोलत असतात.)

शिक्षणाधिकारी :बालवाडी शिक्षकाच्या मानधनात वाढ करणे बाबत सभागृहाची मान्यता झाली. या महिन्याच्या पगारामध्ये त्यांना नोव्हेंबर पासून लाभ मिळेल.

श्री.राजू शिंदे :गरीब मूले या शाळेत शिक्षण घेतात. माझे वार्डात १० वीचे वर्ग चालतात तेथे शिक्षक दिले जात नाही. काही ठिकाणी ९० विद्यार्थ्यां मागे १ शिक्षक आहे. काही ठिकाणी मुले कमी तर शिक्षक जास्त आहे. मानधनावर शिक्षक नेमावे. सेवानिवृत्त घ्यावे.

| | |
|---|---|
| मा.आयुक्त | :स्कुल वाईज शिक्षक व मुलांची संख्या विचारात घेऊन कार्यवाही केली जाईल. १ ते ८ वी पर्यंत शिक्षक भरती शासन करते आता शिक्षक येणार आहे. जेथे गरज आहे तेथे ते दिले जाईल. ९ वी, १० वी साठी शिक्षक भरती करावी लागेल. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :जेथे विद्यार्थी नुसार शिक्षक जास्त असेल तर ते शिक्षक दुसरे शाळेत देत असतांना ती शाळा बंद केली तर ती इमारत मनपाच्या कामासाठी उपयोगात आणावी. नाममात्र भाडेने काही जागा शाळा दिल्या गेल्या तसे होऊ नये. खाजगी व्यक्तीला किंवा संस्थेला देऊ नये. |
| श्री.राजू शिंदे | :बालवाडी शिक्षकाची बदली झाली तरी बदलीच्या ठिकाणी रूजू होत नाही. असे होत असेल तर कार्यवाही करावी. |
| मा.आयुक्त | :शिक्षक बदलीच्या ठिकाणी जाणार नसेल तर त्यांची सेवा समाप्त केली जाईल. |
| मा.महापौर | :विद्यार्थी संख्या व शिक्षकांची संख्या याची सांगड घालावी. जे शिक्षक बदलीच्या ठिकाणी जात नसेल कार्यवाही करावी. |
| श्री.मनोज बल्लाळ | :बालवाडी शिक्षकांना मानधनात वाढ होणार आहे. बदलीच्या ठिकाणी जाण्याबाबत त्यांचेकडून तसे लिहून घेऊन अटी शर्ती टाकाव्यात. |
| श्रीमती सुरेखा सानप | :१० वी पास झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करणार होतो काय झाले? ९० टक्केचे वर त्यांना मार्क आहे. |
| मा.महापौर | :अशा विद्यार्थ्यांच्या सत्कार करणे बाबत तात्काळ कार्यवाही करावी. |
| श्रीमती अंकिता विधाते | :माझे वार्डात शाळा तेथे ३३ विद्यार्थी संख्या आहे. हजेरी ८-१० विद्यार्थी असतात १ ली ते ४ थीचे विद्यार्थी एकत्रच बसतात. |
| मा.महापौर | :शिक्षक व विद्यार्थी यांचे सांगड घालून शिक्षक द्यावे. |
| श्री जमीर कादरी | :कचऱ्याचा प्रश्न चालूच आहे. काल काम सूरू केले. टेंडरमध्ये जे झाले त्यानुसार नव्या रिक्षा ह्या सन-२०१६ हीशोबाने खरेदी करायला पाहिजे. जे वाहन चालक आपल्याकडे १०-१० वर्षापासून काम करीत आहे. ते काम एजन्सीमार्फत का होत नाही? त्यांना सांगण्यात आले की, २००० कमी करणार आहे. यामूळे प्रॉब्लेम निर्माण होईल. आपल्याकडील रिक्षा त्यांना मुक्त का देत आहोत. |
| कक्ष प्रमुख-घनकचरा | :कामगार कायदा जो आहे लेबर कॉन्ट्रक्टनुसार त्यांना प्रचलित कामगार कायदा त्यांना पाहावा लागणार आहे. पगार कामगार कायद्यानुसार द्यावा, असे आहे. |
| श्री.जमीर कादरी | :ज्या रिक्षा आणल्या त्या चार ठिकाणी सिस्टमनुसार कामात आणाव्यात. |
| कक्ष प्रमख घनकचरा | :ओला सुका कचरा घरगुती व सॅनेटरी नॅपकीन व डायपर ई.करणेसाठी व्यवस्था केली आहे. दोन दिवस कामास सुरूवात झाली. काही प्रॉब्लेम असेल तर क्लिअर करू. टेंडरमध्ये होते त्यानुसार रिक्षा कामासाठी दिल्या जाईल. |

(या वेळी स.सदस्य श्री. सिताराम सुरे राजीनामा देण्या बाबत डायस समोर येऊन बोलत असतात.व अनेक सदस्य आपसात बोलत असतात.)

| | |
|---|---|
| श्री.राजेंद्र जंजाळ | :नागरीकांना त्रास होतो. सदस्यांना फोन करतात. अधिकारी नगरसेवकांना वाईट पध्दतीने बोलतात. लोकप्रतिनिधींना लोक नाव ठेवतात. विकास कामे होत नाही. राज्य घटनेचा आर्टीकल २१ नुसार पाण्याची मालकी ही सर्व सामान्य सर्वच लोकांची आहे. पाणी मिळविण्याचा अधिकार दिला आहे. पाणी नाकारू |

| | |
|---|---|
| | शकत नाही. त्यांचे उल्लंघन होते का? जर नगरसेवकांना अधिकारी बोलत असेल तर कार्यवाही करावी. टँकर ऐवजी पाईपलाईन द्वारे पाणी का देत नाही? अधिकारी यांनी मनमानी सहन करणार नाही. जी समस्या येईल आम्ही अधिकारी यांचे फोन देऊ दखल घ्यावी. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :यापूर्वी सदस्यांकडून अपशब्द निघाले होते. सर्वच अधिकारी बाहेर गेले होते. आज श्री.सुरे यांना श्री.कोल्हे बोलले सदस्यांना सन्मान नाही का? |
| श्री.त्र्यंबक तुपे | :मा.आयुक्तांनी सांगूनही काम होत नाही. अधिकारी सांगतात जे करायचे असेल ते करावे असे बोलणे योग्य नाही. इतरही वार्डातील कामे होत नाही. जे अधिकारी श्री.सुरे यांना बोलले त्यांचा निषेध करतो. होणारे काम टाळणे हे योग्य नाही. श्री.बन्सी जाधव यांचे वार्डात अनेक दिवसापासून काम थांबले आहे ते करावे. |
| श्री.प्रमोद राठोड | :सदस्य समस्या मांडतात. अधिकारी काम करत नाही. अधिकारी नोकरी सोडण्याची भाषा करतात हे योग्य नाही. अधिकारी सदस्यांमध्ये भांडण लावतात. नागरीकांच्या समस्या सदस्यांना सोडवाव्या लागतात. मा.आयुक्तांनी कडक कार्यवाही केली पाहिजे. काही अधिकारी नोकरी सोडून जाण्याची भाषा करतात. |
| श्री.जमीर कादरी | :सदस्यांना राजीनामा देण्याची, उपोषण करण्याची वेळ येत असेल तर योग्य नाही. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :नवीन भरती करावी. अधिकारी यांची काम करण्याची इच्छा राहिली नाही. |
| श्रीमती ज्योती अभंग | :लाईटची संचिका एक वर्षापासून मंजूर होत नाही. |
| मा.महापौर | :०५ मिनिटांसाठी सभा तहकूब करण्यात येते (वेळ ५-१५ वाजता पुन्हा सभा ५-४५ वाजता सुरू) |
| मा.महापौर | :आजची सभा तहकूब करण्यात येते. व का.प.क्र.२३ ची सभा ही पूढे ढकलण्यात येते. |

या बरोबर सभा राष्ट्रगिताने संपविण्यात येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |